## एक्झिक्युटिव गोषवारा

मेसर्स जयगड पॉवर ट्रान्स्को लिमिटेड (जेपीटीएल) ही जेएसडब्ल्यू एनर्जी लिमिटेड (जेएसडब्ल्यूईएल) आणि महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड (एमएसईटीसीएल) यांची संयुक्त कंपनी असून जयगड-न्यू कोयना आणि जयगड-कऱ्हाड ट्रान्समिशन लाईन्स व त्याचबरोबर संबंधित उपकरणे /टर्मिनल बेज यांचा विकास, कामकाज आणि देखभाल करण्यासाठी 23 एप्रिल 2008 रोजी तिची स्थापना करण्यात आली.

माननीय कमिशन यांनी जेपीटीएलला प्रस्तावित ट्रान्समिशन यंत्रणेची प्रस्थापना, कामकाज आणि देखभाल करण्यासाठी 25 वर्षांच्या कालावधीसाठी ट्रान्समिशन परवाना (2008 चा परवाना क्र.1) दिनांक 8 फेब्रुवारी 2009 ह्या तारखेला दिला. जेपीटीएलने माननीय कमिशन यांना 22 सप्टेंबर 2009 रोजी डीपीआर सादर करून प्रस्तावित ट्रान्समिशन योजनेसाठी आवश्यक भांडवल गुंतविण्यासाठी त्यांची तत्वत: मंजुरी मागितली. माननीय कमिशन यांनी जेपीटीएलने सादर केलेल्या रू.580.00 कोटीच्या अंदाजानुसार रू.576.29 कोटी इतक्या भांडवलाची गुंतवणूक करण्यासाठी आपल्या दिनांक 29 जून 2010 चे पत्र क्रमांक: एमईआरसी/सीएपी/डीपीआर/11/10/00616 अन्वये तत्वत: मंजुरी दिली.

जेपीटीएलने 400 केव्ही डी/सी (क्वाड)जयगड-न्यू कोयनाच्या कार्यान्वितीकरणाच्या तारखेनुसार आणि 400 केव्ही डी/सी (क्वाड)जयगड-कऱ्हाड ट्रान्समिशन लाईनच्या अपेक्षित कार्यान्वितीकरणाच्या अनुक्रमे 7 जुलै 2010 आणि 1 फेब्रुवारी 2011 ह्या तारखांनुसार आर्थिक वर्ष 2010-11 साठी 1 डिसेंबर 2010 रोजी एआरआर अर्ज सादर केला. माननीय कमिशन यांनी ह्या संदर्भात योग्यती नियामक कार्यवाही केली आणि 25 मे 2011 रोजी आदेश जारी केले.

त्याचबरोबर, माननीय कमिशन यांनी 4 फेब्रुवारी 2011 रोजी आपले एमवायटी रेग्यूलेशन जारी केले ज्याद्वारे 1 एप्रिल 2011 पासून राज्यात एमवायटी नियम सादर करण्यात आले. परंतु, कमिशनने त्यानंतर एमवायटी नियम 2011 मध्ये सुधारणा जारी केल्या, ज्यानुसार कमिशनने 4 नोव्हेंबर 2011 च्या आपल्या पत्राद्वारे एमईआरसी (टॅरिफसंबंधी नियम व अटी) नियम, 2005 नुसार आर्थिक वर्ष 2011-12 साठी एआरआर मंजूर करून घेण्यासाठी उशीरात उशीरा 30 नोव्हेंबर 2011 पर्यंत अर्ज सादर करण्याच्या सूचना केल्या.

त्यानुसार जेपीटीएलने आर्थिक वर्ष 2010-11 साठी ट्रू-अपच्या मंजुरीसाठी आणि आर्थिक वर्ष 2011-12 साठी टॅरिफ रेग्युलेशन्स, 2005 च्या एमईआरसी नियम व अटींनुसार आवश्यक आर्थिक महसूलाच्या मंजुरीसाठी अर्ज सादर केला. ह्या अर्जावरील पुढच्या टप्प्याची प्रक्रिया सुरू आहे.

कमिशनने त्यांच्या उपरोल्लेखित पत्राद्वारे जेपीटीएलला दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी व्यवसाय योजना देखील सादर करण्याच्या सूचना दिल्या. जेपीटीएलने त्यामुळे नियंत्रण कालावधीच्या उर्वरित कालावधीसाठी म्हणजे आर्थिक वर्ष 12-13 व आर्थिक वर्ष 13-16 साठी व्यवसाय प्रस्ताव तयार करण्यास सुरूवात केली.

जेपीटीएलने एमईआरसी एमवायटी नियम, 2011 मधील तरतुदींवर आधारित 2ऱ्या नियंत्रण कालावधीसाठी एआरआर प्रोजेक्शन्स तयार केले आहे. 2ऱ्या नियंत्रण कालावधीसाठी तयार करण्यात आलेले एआरआर प्रोजेक्शन्स खालील प्रमाणे आहे:

**एमवायटी नियंत्रण कालावधीसाठी जयगड - न्यू कोयना ट्रान्समिशन लाईन साठी एआरआर**

| तपशिल (आकडे कोटी रूपयात) | FY 13 | FY 14 | FY 15 | FY 16 |
|---|---|---|---|---|
| आरओई | 6.96 | 6.96 | 6.96 | 6.96 |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | 14.94 | 13.76 | 12.57 | 11.39 |
| घसारा | 9.48 | 9.48 | 9.48 | 9.48 |
| आयकर | 1.74 | 1.74 | 1.74 | 1.74 |
| कामकाज व देखभाल खर्च | 3.76 | 3.99 | 4.22 | 4.47 |
| खेळते भांडवल आणि ट्रान्समिशन उपभोक्त्यांकडून मिळालेल्या ठेवींवरील व्याज | 0.77 | 0.75 | 0.74 | 0.72 |
| आनुषंगिक राखिव निधीसाठी योगदान | 0.45 | 0.45 | 0.45 | 0.45 |
| **एकुण आवश्यक महसूल** | **38.11** | **37.13** | **36.16** | **35.21** |
| वजा: टॅरिफ व्यतिरिक्त मिळकत | 0.05 | 0.09 | 0.13 | 0.16 |
| वजा: इतर व्यवसायांमधील मिळकत | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| **निव्वळ एकुण आवश्यक महसूल** | **38.05** | **37.04** | **36.04** | **35.05** |

**एमवायटी नियंत्रण कालावधीसाठी जयगड - कऱ्हाड ट्रान्समिशन लाईन साठी एआरआर**

| तपशिल (आकडे कोटी रूपयात) | FY 13 | FY 14 | FY 15 | FY 16 |
|---|---|---|---|---|
| आरओई | 14.96 | 14.96 | 14.96 | 14.96 |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | 34.39 | 31.84 | 29.30 | 26.75 |
| घसारा | 20.38 | 20.38 | 20.38 | 20.38 |
| आयकर | 3.74 | 3.74 | 3.74 | 3.74 |
| कामकाज व देखभाल खर्च | 5.55 | 5.88 | 6.23 | 6.60 |
| खेळते भांडवल आणि ट्रान्समिशन उपभोक्त्यांकडून मिळालेल्या ठेवींवरील व्याज | 1.62 | 1.58 | 1.54 | 1.50 |

| तपशिल (आकडे कोटी रूपयात) | FY 13 | FY 14 | FY 15 | FY 16 |
|---|---|---|---|---|
| आनुषंगिक राखिव निधीसाठी योगदान | 0.96 | 0.96 | 0.96 | 0.96 |
| **एकुण आवश्यक महसूल** | **81.60** | **79.34** | **77.11** | **74.90** |
| वजा: टॅरिफ व्यतिरिक्त मिळकत | 0.04 | 0.12 | 0.20 | 0.27 |
| वजा: इतर व्यवसायांमधील मिळकत | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| **निव्वळ एकुण आवश्यक महसूल** | **81.56** | **79.23** | **76.91** | **74.62** |

### एमवायटी नियंत्रण कालावधीसाठी दोन्ही ट्रान्समिशन लाईन्ससाठी एकत्रित एआरआर

| तपशिल (आकडे कोटी रूपयात) | FY 13 | FY 14 | FY 15 | FY 16 |
|---|---|---|---|---|
| आरओई | 21.92 | 21.92 | 21.92 | 21.92 |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | 49.33 | 45.60 | 41.87 | 38.14 |
| घसारा | 29.86 | 29.86 | 29.86 | 29.86 |
| आयकर | 5.48 | 5.48 | 5.48 | 5.48 |
| कामकाज व देखभाल खर्च | 9.31 | 9.86 | 10.45 | 11.07 |
| खेळते भांडवल आणि ट्रान्समिशन उपभोक्त्यांकडून मिळालेल्या ठेवींवरील व्याज | 2.39 | 2.33 | 2.28 | 2.23 |
| आनुषंगिक राखिव निधीसाठी योगदान | 1.41 | 1.41 | 1.41 | 1.41 |
| **एकुण आवश्यक महसूल** | **119.71** | **116.47** | **113.27** | **110.11** |
| वजा: टॅरिफ व्यतिरिक्त मिळकत | 0.09 | 0.21 | 0.32 | 0.44 |
| वजा: इतर व्यवसायांमधील मिळकत | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| **निव्वळ एकुण आवश्यक महसूल** | **119.62** | **116.26** | **112.95** | **109.67** |

सध्याचा अर्ज दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी व्यवसाय योजनेला मंजुरी मिळविण्यासाठी कमिशन यांचेकडे सादर करण्यात आला आहे. वरील वस्तूस्थिती आणि परिस्थिती पाहता, जेपीटीएल माननीय कमिशन यांस खालील प्रमाणे आदरपूर्वक प्रार्थना करत आहे की:

ए. एमवायटी 2ऱ्या नियंत्रण कालावधीसाठीच्या व्यवसाय योजनेला मंजुरी देण्यासाठी जेपीटीएलचा अर्ज दाखल करून घ्यावा.

बी. व्यवसाय योजनेत प्रस्तावित करण्यात आल्यानुसार संबंधित कामकाजात्मक व आर्थिक निकषांसह दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी व्यवसाय योजना मंजूर करावी.

सी. अर्जात प्रस्तावित केल्यानुसार संबंधित कामकाजात्मक व आर्थिक निकषांसह जेपीटीएलद्वारा ह्या अर्जात प्रस्तावित केल्यानुसार दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी

व्यवसाय योजनेच्या संदर्भात योग्य आदेश जारी करावेत. चुकून काही वगळले गेल्यास, चुक झाल्यास, तृची असल्यास त्या माफ करावयात आणि जेपीटीएलला ह्या सादरिकरणात काही समाविष्ट/बदल/सुधारणा/दुरूस्ती करण्याची आणि भविष्यात आवश्यक असेल त्यानुसार अधिक सादरिकरण देण्याची परवानगी द्यावी, आणि

डी. ह्या घटनेतील वस्तूस्थिती आणि परिस्थितीनुसार अचूक आणि योग्य वाटेल त्यानुसार असे इतर आणि पुढील आदेश जारी करावेत.